# अनुसूचित जाती कल्याण समिती

## महाराष्ट्र विधानसभा नियमातील तरतुद

**म.वि.स. नियम २३३.**

(१) दरवर्षी, विधानसभेच्या पहिल्या अधिवेशनाच्या किंवा, यथास्थिती, नव्याने रचना केलेल्या विधानसभेच्या पहिल्या अधिवेशनाच्या प्रारंभानंतर, शक्य तितक्या लवकर, अनुसूचित जातींच्या कल्याणासाठी समिती स्थापन करण्यात येईल. या समितीमध्ये जास्तीत जास्त पंधरा सदस्यांचा समावेश असेल. अध्यक्ष, त्यापैकी विधानसभेच्या सदस्यांमधून, जास्तीत जास्त अकरा सदस्य नामनिर्देशित करतील आणि त्याच रीतीने सभापती विधानपरिषदेच्या सदस्यांमधून जास्तीत जास्त चार सदस्य नामनिर्देशित करतील.

(२) या समितीचे सदस्य, नवीन समितीची रचना करण्यात येईपर्यंत पद धारण करतील.

**म.वि.स. नियम २३४.**

अनुसूचित जातींच्या कल्याणासाठीच्या समितीची कर्तव्ये पुढीलप्रमाणे असतील,-

(एक) संविधानाच्या अनुच्छेद ३३८ (२) अन्वये आयुक्त, अनुसूचित जाती व अनुसूचित जनजाती यांनी सादर केलेल्या अहवालावर जेथवर महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातीशी त्यांचा संबंध येत असेल तेथवर, विचार करणे आणि राज्य शासनाच्या कक्षेत येणाऱ्या बाबीसंबंधात राज्य शासनाने काय उपाययोजना करावी, याविषयीची माहिती दोन्ही सभागृहांना सादर करणे ;

(दोन) समितीने सुचविलेल्या उपाययोजनांबाबत राज्य शासनाने केलेल्या कार्यवाहीविषयी दोन्ही सभागृहांना माहिती देणे ;

(तीन) अनुच्छेद ३३५ च्या तरतुदी विचारात घेऊन राज्य शासनाने आपल्या नियंत्रणाखालील सेवांमध्ये व पदावर (यात सार्वजनिक क्षेत्र उपक्रमांतील, सांविधिक व निमसरकारी संस्थांमधील नियुक्त्यांचाही समावेश आहे.) अनुसूचित जातींच्या उमेदवारांना योग्य प्रमाणात प्रतिनिधित्व मिळावे यासाठी केलेल्या उपाययोजनांचे परीक्षण करणे ;

(चार) राज्य शासनाच्या कक्षेत येणाऱ्या अनुसूचित जातींच्या कल्याणासंबंधात सर्व बाबींचा सर्वसाधारणत: विचार करणे व दोन्ही सभागृहांना त्याबाबत अहवाल देणे ;

(पाच) सभागृहाने अथवा अध्यक्षांनी समितीकडे विनिर्देशपूर्वक निर्दिष्ट केलेल्या बाबीचे परीक्षण करणे.